# "स्थानीय व्यवस्थापन समिती"ची सभा दि.२०नोव्हेंबर २०१७

आनंद निकेतन विज्ञान,कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या "स्थानीय व्यवस्थापन समितीची सभा दिनांक २०नोव्हेंबर २०१७ला सोमवारी सकाळी १०वा. ३०मि. वाजता महारोगी सेवा समिती,कार्यालय आनंदवन येथे माननीय डॉ. विकासभाऊ आमटे यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली.

या सभेला पुढील प्रमाणे गणमान्य सभासद उपस्थित होते.

| अ.क्रं | नाव | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | आदरणीय डॉ. विकासभाऊ आमटे | अध्यक्ष | (स्वाक्षरी) |
| २ | डॉ. शितल विकास आमटे | सदस्य | (स्वाक्षरी) |
| ३. | श्री. गौतम शिरिष करजगी | -॥- | (स्वाक्षरी) |
| ४. | डॉ. दिलीप रामकृष्ण पेशवे | -॥- | (स्वाक्षरी) |
| ५. | डॉ. विजय गोविंद पोळ | -॥- | (स्वाक्षरी) |
| ६ | श्री. सुधाकर विठोबाजी कडू | -॥- | (स्वाक्षरी) |
| ७. | प्रा. विजयशंकरराव धाबर्डे | शिक्षक प्रतिनिधी | (स्वाक्षरी) |
| ८. | डॉ. संजय नारायणराव साबळे | -॥- | (स्वाक्षरी) |
| ९. | प्रा. बबन बळीरामजी अवघडे | -॥- | (स्वाक्षरी) |
| १० | श्री. हरी फकुजी खुडसंगे | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी | (स्वाक्षरी) |
| ११ | डॉ. मृणाल चंद्रकांत काळे | प्राचार्य तथा सचिव स्थानीय व्यवस्थापन समिती | (स्वाक्षरी) 20/11/17 |

## -सभाध्यक्षपदी निवड-

उपस्थित गणमान्य सभासदांनी एकमताने सभाध्यक्ष पदी माननीय डॉ. विकासभाऊ आमटे यांची निवड केली.

## - स्वागत व ऋण निर्देश -

डॉ. मृणाल चंद्रकांत काळे, प्राचार्य व सचिव, स्थानीय व्यवस्थापन समिती, आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, आनंदवन-वरोरा. यांनी उपस्थित गणमान्यांचे शब्दसुमनांनी यथोचित स्वागत केले. महाविद्यालयाच्या "दैनंदिन कार्य, विस्तारकार्यात तसेच वारंवार प्राप्त होणाऱ्या सहकार्या बद्दल आनंदवन परीवाराचे विशेष आभार मानले. सांप्रत १५ व १६ सप्टेंबरला महाविद्यालयास, राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद बंगलूर यांचे विशेषज्ञ-चमू ने भेट दिली. सदरचा प्राप्त निरीक्षण अहवालानुसार महाविद्यालयास प्राप्त गुणांकन 'बी++' आहे. सदर यश हे निव्वळ व्यवस्थापनाच्या सक्रीय बहुमोल सहभागा प्राप्त झाले. या बद्दल व्यवस्थापनाचे ऋण आहेत.

ठरावक्रं.१.] मागील सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देणे.

मागील सभा दिनांक १० ऑक्टोबर २०१६ सोमवारी, सकाळी ११वाजता महारोगी सेवा समितीच्या मुख्य कार्यालयात मा. डॉ. विकासभाऊ आमटे, यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तांचे वाचन, सभे समोर करण्यात आले.

"मागील सदर सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर"

ठरावक्रं.२.] आर्थिक वर्ष २०१६-२०१७चे आयव्यय पत्रकास मंजूरी देणे.

आर्थिक वर्ष २०१६-२०१७चे अंकेक्षीत लेखे 'आयव्यय, जमाखर्च पत्रक व ताळेबंद' सभे समोर सादर करण्यात आला. यांवर दीर्घ चर्चा, विचारविनिमय झाला.

"आर्थिक वर्ष २०१६-२०१७चे आयव्यय पत्रक सर्वानुमते मंजूर"

ठरावक्रं. ३.] आर्थिक वर्ष २०१७-२०१८चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

आर्थिक वर्ष २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक सभे समोर सादर करण्यात आले. सविस्तर चर्चे दरम्यान पुढील वर्षांचे २०१८-२०१९चे अंदाजपत्रक तयार करण्या पूर्वी गणमान्य सदस्यांना सुचित करण्यात येईल व पूर्वतयारी म्हणून आधारभूत माहिती जानेवारी २०१८चे पूर्वार्धात पुरविण्यात येईल.

"आर्थिक वर्ष २०१७-२०१८चे अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर"

ठरावक्रं. ४.] वेतन व वेतन विषयक कार्यवाहीस मंजूरी देणे.

अ.] सेवानिवृत्ती प्रकरणे

सांप्रत २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात खालील कर्मचारी सेवानिवृत्त झाले.

१.) श्री. वसंत लक्ष्मणराव वैद्य, प्रयोगशाळा परिचर दि. ३० जून २०१७
२.) श्री एस. एस. शेंडे, प्रयोगशाळा परिचर दि ३० सप्टेंबर २०१७
३.) डॉ. मिलींद शंकरराव देशपांडे, सहयोगी प्राध्यापक ——॥——

उपरोक्त सर्व प्रकरणात महाविद्यालयीन स्तरावरील कार्यवाही पूर्ण करून अग्रेषीत केले आहे. सदर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, गट विमा ई. अंतीम प्रदान अदा केले. वरीष्ठ लेखा परिक्षक, सहसंचालक कार्यालय यांचे निर्देशानुसार डॉ. मिलींद शंकरराव देशपांडे यांना अतिरिक्त प्रदान केलेल्या वेतनाची वसूली त्यांचे वेतनातून वसूल करून चालान द्वारे रू. ७१४१२ शासनास परत केले आहेत.

"प्राचार्यांनी केलेली कार्यवाही सर्वानुमते मंजूर"

दि. २० नोव्हेंबर २०१७ च्या सभेतील उपरोक्त ठरावास मंजूरी, मान्यता आहे.

स्वाक्षरी

अध्यक्ष
स्थानिय व्यवस्थापन समिती

स्वाक्षरी

Dhale

सचिव / प्राचार्य
स्थानिय व्यवस्थापन समिती